लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार - १६ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १६४
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते
Online Booking : www.vishwatravels.in

# मराठवाड्याला ५९ हजार कोटींचे पॅकेज



छत्रपती संभाजीनगर : राज्य मंत्रिमंडळाच्या आज येथे झालेल्या बैठकीनंतर राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये मराठवाड्यातील विविध विकास प्रकल्पांसाठी ४५ हजार कोटी रूपये तर नदीजोड प्रकल्पासाठी १४ हजार कोटी रूपये असे मिळून ५९ हजार कोटी रूपयांचे पॅकेज घोषीत केले आहे. सात वर्षांपूर्वी झालेल्या येथील बैठकीत त्यावेळच्या सरकारने ४० हजार कोटी रूपयांचे पॅकेज घोषीत केले होते.

मराठवाड्याला न्याय देण्यासाठी आणि ठोस निर्णय घेण्यासाठी आमची बैठक पार पडली. यापूर्वी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते तेव्हा बैठक झाली होती. राज्यातच नाही तर देशात एक मोठी झेप मराठवाड्याने घेतली आहे. अनेकांनी घोषणा केल्या, आम्ही काम करतो आहोत. आत्तापर्यंत आमच्या मंत्रिमंडळाने सामान्य लोकांना डोळ्यासमोर ठेवूनच निर्णय घेतले आहेत असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

वर्षभरात आमच्या महायुती सरकारने जे निर्णय घेतले पहिल्या कॅबिनेटपासून ते आजपर्यंत, त्यात सर्व सामान्यांचं हित डोळ्यासमोर ठेवून घेतले. आतापर्यंत शेतीला पाणी पाहिजे, जमिनीला पाहिजे ही भावना ठेवून ३५ सिंचन प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. त्यामुळे ८ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

आम्ही घोषणा करून कागदावर ठेवत नाही. त्याची अमलबजावणी करतो. आम्ही जे निर्णय घेतले ते मराठवाड्याच्या विकासासाठी, मराठवाड्यातील लोकांना न्याय देण्यासाठी आहे. जे प्रकल्प प्रलंबित आहेत ते आम्ही मार्गी लावत आहोत. समृद्धी महामार्ग मराठवाड्याला लागून जातो. त्याचा फायदा होईल. औद्योगिक इंडस्ट्री वाढते आहे. त्याचाही फायदा मराठवाड्याला होणार आहे, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

गोदावरी खोऱ्यात पाणी वळवण्यात येणार आहे. त्यावर १३ हजार कोटीचा खर्च अपेक्षित आहे. सिंचनावरील १४ हजार कोटी आणि गोदावरी खोऱ्यासाठीचे १३ हजार कोटी असे मिळून सिंचनावर एकूण २७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.




## हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ परिसरात विद्युत रोषणाई

उद्या १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त लातूर येथील मनपा समोरील हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन होणार असल्याने मराठवाडा मुक्तीसंग्राम वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला स्मृतीस्तंभ परिसर विद्युत रोषणाईने लक्ष वेधून घेत आहे. (फोटो- प्रकाश कंकाळ)

# लातूर जिल्हयास झुकते माप-ना. संजय बनसोडे

**लातूर : संभाजीनगर येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मराठवाड्यासाठी ६० हजार कोटी रूपयांच्या पॅकेजची घोषणा केली. यात लातूर जिल्हयाला झुकते माप मिळाले असून जिल्हयातील अनेक योजनांसाठी निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे यांनी वरील तिन्ही नेत्यांचे आभार मानले आहेत.**

आजच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर लातूर जिल्ह्याला झुकते माप मिळाल्याची भावना ना. बनसोडे यांनी व्यक्त करून जाहीर झालेला निधी कागदावर राहणार नाही तर तो तातडीने खर्च करण्यास सुरूवात होईल. जिल्ह्यातील या सर्व योजनांचा प्लॅन तयार आहे, अशी प्रतिक्रिया ना. संजय बनसोडे यांनी दै. भूकंपला भ्रमणध्वनीवरून बोलत असताना दिली आहे.

**जिल्हा रूग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला**

लातूर जिल्हयामध्ये जिल्हा रूग्णालयाचे कार्यालय आहे. पण, रूग्णालय नाही अशी अवस्था गेली काही वर्षांपासून निर्माण झाली आहे. या जिल्हा रूग्णालयाला लातूरच्या कृषी महाविद्यालयाच्या जागेपैकी ४ हेक्टर जागा जिल्हा सामान्य रूग्णालयाकरीता उपलब्ध करून देण्यासाठी २.८२ कोटी रूपये आरोग्य विभागाकडून कृषी विभागाला देण्यास मंजुरी देण्यात आली. लातूर येथील विमानतळाच्या विस्तारासाठी अतिरिक्त भूसंपादन निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. लातूर येथे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मध्यवर्ती प्रशासकीय इमारत व



नियोजन भवन इमारतीच्या बांधकामास भरीव मंजुरी देण्यात आली आहे.

लातूरकरांचा पिण्याच्या पाण्यासंदर्भात प्रश्न चर्चेला येताच उजनीचं पाणी यावर चर्चा होते. मात्र, या बैठकीत उजनीच्या पाण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याचे ना. संजय बनसोडे यांनी सांगितले. पण, मराठवाड्यासाठी महत्वाचा असलेला वॉटर ग्रीडला मान्यता देण्यात आली असून त्यात लातूर जिल्ह्यातील अनेक प्रकल्पासाठी भरीव तरतुदीस मंजुरी देण्यात आली आहे, असे ना. बनसोडे यांनी सांगितले.

राज्य मंत्रिमंडळात उदगीरचे आ. ना. संजय बनसोडे यांचा क्रीडामंत्री म्हणून समावेश झाला. त्यांना मिळालेले खाते सामान्य असे वाटत असले तरी त्यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे चिकाटीने पाठपुरावा करून लातूर जिल्ह्यातील अनेक प्रकल्पासाठीच्या निधीची मंजुरी घेण्यात यश मिळविले आहे.

## उदगीर मतदारसंघास अधिकचा निधी

मराठवाड्यासाठी घोषीत करण्यात आलेल्या घसघशीत पॅकेजमध्ये लातूर जिल्ह्यातील अनेक योजनांचा समावेश असला तरी जिल्ह्यातील उदगीर विधानसभा मतदार संघात (ना. संजय बनसोडे यांचा मतदारसंघ) अनेक योजना मंजूर झाल्याचे दिसत आहे. त्याबाबत ना. बनसोडे यांना जिल्ह्यात उदगीर मतदार संघात झुकते माप नाही का? असे विचारता तळे राखेल तो... अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. उदगीरमध्ये भूमीगत गटार, हत्तीबेट विकासासाठी २५ कोटी, उदयगिरी किल्ला संवर्धनासाठी ५ कोटी, मन्याड नदीवर सात बॅरेजेससाठी कोट्यावधीचा निधी, जळकोट व उदगीर येथील बसस्थानकासाठी पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या रकमेशिवाय आणखी प्रत्येकी ५ कोटी रूपये अधिकचा निधी याला मंजुरी देण्यात आली आहे. उदगीर येथे भव्य व अत्याधुनिक असे क्रीडा संकुल उभारणीसाठी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ८३ कोटी रूपयास मंजुरी दिली आहे. उदगीर, जळकोट, चाकूर येथे एमआयडीसी विकसीत करणे, यासाठीच्या निधीलाही मंजुरी देण्यात आली आहे. अहमदपूर येथे ट्रॉमा केअर सेंटर, अहमदपूर येथे अंडरग्राऊंड ड्रेनेज, तिरू नदीवर डावा-उजवा कालव्यासाठी भरीव निधी याची तरतूद करण्यात आली आहे. देवणी गोवंशाच्या संवर्धनासाठी मोठा निधी मंजूर करण्यात आल्याचे संजय बनसोडे यांनी सांगितले.

# डॉ. बबन जोगदंड यांना मराठवाडा भूषण पुरस्कार



पुणे : यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी 'यशदा' या संस्थेतील माध्यम व प्रकाशन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांना मराठवाडा समन्वय समिती पुणे यांच्यावतीने शैक्षणिक क्षेत्रातील योगदाना बद्दल या वर्षीचा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे.

मराठा समन्वय समिती यांच्यावतीने दरवर्षी पुण्यामध्ये १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिन महोत्सव साजरा केला जातो. यानिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रातील पाच ते सहा मान्यवरांना 'मराठवाडा भूषण' पुरस्कार देण्यात येतो.

यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल डॉ.बबन जोगदंड यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे मराठवाडा मुक्ती दिन महोत्सव कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. डॉ. बबन जोगदंड हे मूळचे नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असून ते यशदा मध्ये गेल्या वीस वर्षापासून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पत्रकारितेमध्ये दहा वर्ष काम केले आहे. विशेषत: त्यांनी २५ विषयांमध्ये पदव्या संपादन केल्या असून या पदव्यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. ते चांगले वक्ते, अभ्यासक, विचारवंत साहित्यिक आहेत. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड केल्याचे मराठवाडा समन्वय समितीचे अध्यक्ष राजकुमार धुरगुडे पाटील व सचिव दत्ताजी म्हेत्रे यांनी एका कळविले आहे.

# सुप्रशासन आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी पुरस्कार

मुंबई : स्वराज्य मॅगझीनच्यावतीने गुड गव्हर्नन्स (सुप्रशासन) आणि महाराष्ट्रात पायाभूत सुविधा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पाँडेचेरीत 'पाँडी लिट फेस्टिव्हल'मध्ये हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबईत हा पुरस्कार स्वराजचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसन्न विश्वनाथन आणि संपादकीय संचालक आर. जगन्नाथन यांच्या हस्ते स्वीकारला.

स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरुप असून उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पुरस्काराची रक्कम दुष्काळ निवारण उपाययोजनांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला दिली आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असण्यामध्ये डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांचे अमूल्य योगदान आहे. डॉ. मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रेरणेनुसारच आमची वाटचाल सुरू आहे. सुशासन हा एकप्रकारे प्राणवायूच असतो. तो असेल तर किंमत नसते आणि नसला तर अस्वस्थता वाढते. सुशासन हा प्रशासनाचा पाया आहे. विविध क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे नागरिकांचे जीवनमान उंचावते आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.



उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या कल्पकतेने गेल्या काळात अनेक क्रांतिकारी निर्णय आणि सुधारणांद्वारे प्रशासकीय कामकाजात आमूलाग्र बदल घडले असून उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प इतिहासात मैलाचा दगड ठरत आहेत.

जनतेशी सहजतेने जवळीक साधण्याचे कसब, ध्येयासक्त, प्रामाणिक, आधुनिक तंत्रज्ञानातील जाणकार यांसारख्या गुणांनी उपमुख्यमंत्री फडणवीस हे देशात ओळखले जातात, अशा शब्दात उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा गौरव मानपत्रात करण्यात आला आहे.

## त्यांच्या मते....

▣ **आजच्या आधुनिक जगात महिलांसोबत पुरूषांनीही घरातील निम्म्या कामाचा वाटा उचलायला हवा.**

- मुंबई उच्च न्यायालय

☛ झाडलोट, धुणी-भांडी, स्वयंपाक, फरशी पुसणे यासाठीच्या कार्यशाळेत प्रवेश घ्यावा लागणार

▣ **आघाडी सरकारने राज्यात अडीच वर्षे काहीच केलं नाही ते आमच्या सरकारने केले.**

-ना. देवेंद्र फडणवीस

☛ नुसते आरोप, प्रत्यारोप नको.

▣ **राजा खातोय तुपाशी, जनता उपाशी.**

- विजय वडेट्टीवार

☛ म्हणं सार्थ ठरवायची असावी.

▣ **जिथे दर मिळेल तिथेच ऊस नेणार, आम्हाला अडवून तरी दाखवा.**

- राजू शेट्टी

☛ उद्योगपतीच्या उत्पादनाला राज्यबंदी नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला का?

# नागरीकांनो, पाण्याचा वापर काटकसरीने करा !

## लघुपाटबंधारे विभागाचे नागरिकांना आवाहन

लातूर : जलसंपदा विभागाच्या एकूण १७१ प्रकल्पामध्ये सध्या केवळ २४.१२ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. भविष्यातील निर्माण होणारी पाणी टंचाईची लक्षात घेता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातील पाणी हे केवळ पिण्याच्या प्रयोजनासाठी आरक्षित केले आहे. त्यामुळे या सर्व प्रकल्पातील पाण्याचा उपयोग हा केवळ पिण्याच्या पाण्यासाठी करणे अत्यावश्यक असून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी पाण्याचा वापर करून नये. तसेच नागरिकांनी अतिशय काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे.

पिण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी पाण्याचा वापर होत असल्यास तात्काळ दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे. पाणी टंचाईची समस्या सोडवण्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन, वापर होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ व २ चे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

# उसाला राज्यबंदी तर पुढाऱ्यांना गावबंदी-शेतकरी संघटना

लातूर : महाराष्ट्र राज्यातील ऊस हा शेजारच्या कर्नाटक, तेलंगणा, गुजरात राज्यात नेण्यास बंदी घालण्याची अधिसूचना, सहकार विभागाने काढली असून शेतकरी संघटना या निर्णयाचा निषेध करेल. पुढाऱ्यांना गावबंदी करून बँड लावून ऊस शेजारच्या राज्यात देण्यास घातलेली बंदी तोडेल असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सस्तापुरे यांनी दिला आहे.

यावर्षी पावसाळ्यात पाऊस कमी पडला त्यामुळे ऊसाची वाढ झाली नाही परतीचा पाऊस चांगला झाला नाही तर शेतकरी जनावराच्या चाऱ्यासाठी ऊस ठेवतील व गाळप हंगाम धोक्यात येईल आशी कारखानदारांना भिती वाटू लागल्यामुळे राज्य सरकारने शेजारील राज्यातील कारखान्याला ऊस घालायला बंदी करणारी अधिसुचना जारी केली आहे. यानुसार एप्रिल २०२४ पर्यंत शेजारील कर्नाटक, गुजरात, तेलंगना, राज्यात शेतकऱ्यांना ऊस घालायला बंदी घालण्यात आली आहे आशी अधिसुचना सहकार विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी काढली आहे.

उसाला राज्यबंदी करण्याचा निर्णय हा शेतकऱ्यावर अन्याय करणारा आहे. हा प्रकार शेतकऱ्याला आडवुन लुटण्याचा आहे. तुट आसेल तर लूट मुबलकता आसेल तर लिलाव हे शेतीमालाच्या बाबतीतले सरकारचे अधिकृत धोरण बनले आहे. हे यापुढे खपवुन घेतले जाणार नाही पराज्यातील कारखानदार बाराव्या मिहिन्यात ऊसतोड करतात आणी महाराष्ट्रत तिन वर्षात दोनदा ऊसतोड होते मग ऊस वेळेवर जात आसेल भाव चांगला मिळत आसेल तिथे शेतकरी ऊस घालन्याचा त्याला पुर्ण अधिकार आहे. त्याला कोनीही रोकु शकत नाही त्यामुळे सरकारने निर्णय ताबडतोब माघार घ्यावा अन्यथा शेतकरी संघटना सर्व पक्षाच्या पुढाऱ्याला गावबंदी करणार व बॅन्ड लाऊन राज्यबंदी तोडणार असल्याचे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सस्तापुरे यांनी सांगितले.

# छत्रपती संभाजीनगर, धाराशिव महसुली विभाग नामकरण फलकाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती शिवाजी महाराज की जय...छत्रपती संभाजी महाराज की जय... या जयघोषाच्या निनादात छत्रपती संभाजीनगर महसुली विभागाचे आणि धाराशिव महसुली विभागाच्या नामकरण फलकांचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करण्यात आले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर आज येथे मंत्रिमंडळ बैठकीसाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांचे छत्रपती संभाजीनगर येथे आगमन झाले. स्मार्ट सिटी कार्यालयात मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री पवार आणि मंत्रिमंडळातील सहकारी उपस्थित होते.

यावेळी छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव महसुली विभाग, जिल्हा, तालुका, गाव या नामकरण फलकाचे अनावरण मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज की जय...छत्रपती संभाजी महाराज की जय या जयघोषामुळे परिसर दुमदुमला.

## देशात सर्वात आधी कुठे होतो सूर्योदय आणि सूर्यास्त? जाणून घ्या याशी संबंधित रंजक प्रश्न आणि उत्तरे




सूर्योदय आणि सूर्यास्ताशी संबंधित अनेक तथ्ये आहेत, जी खूप मनोरंजक आहेत. आकाश निरभ्र असताना सूर्य उगवताना पाहून तुमच्यात ऊर्जा भरते. आता साहजिक प्रश्न असा आहे की भारतासारख्या मोठ्या देशात सूर्य कधी आणि कुठे उगवतो? याचे सोपे उत्तर आहे - अरुणाचल प्रदेश. हे चीनच्या सीमेला लागून असलेल्या अरुणाचल प्रदेशच्या ईशान्य राज्याच्या अंजा जिल्ह्यातील डोंग शहरात दिसते. हे एक छोटेसे शहर आहे, जिथे पर्यटकही येऊ लागले आहेत. अरुणाचलला उगवत्या सूर्याची भूमी असेही म्हणतात. त्याचप्रमाणे गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील गुहर मोती हे ठिकाण आहे जिथे सर्वात आधी सूर्यास्त होतो.

या दोन ठिकाणी सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळेत बराच फरक आहे. या कारणास्तव, ईशान्येकडील राज्ये अनेकदा भारतातील दोन टाइम झोनबद्दल बोलतात, सध्या येथे फक्त एकच टाइम झोन आहे. आपल्या देशात सरकारी कार्यालये साधारणपणे १० वाजता उघडतात. अशा स्थितीत अरुणाचल प्रदेशातील एक व्यक्ती दुपारच्या सुमारास कार्यालयात पोहोचते आणि तेथे सूर्यास्त लवकर होत असल्याने तो संध्याकाळी उशिरा घरी परततो. हा त्यांच्या सवयीचा भाग असला तरी आपली दिनचर्या आजही सूर्योदय आणि सूर्यास्तानुसार ठरवली जाते, त्यामुळे तेथील लोकांच्या समस्या सहज समजू शकतात.

नॅशनल फिजिक्स लॅबोरेटरीनेही भारतात दोन टाइम झोन प्रस्तावित केले आहेत. ही तिच एजन्सी आहे, जी अधिकृतपणे देशातील वेळेचे मानके ठरवते. सीमांकन प्रस्ताव असा आहे की आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये एक अरुंद सीमारेषा आहे. याआधी राज्यांसाठी वेगळा वेळ क्षेत्र असू शकतो, ज्यामध्ये आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, आसाम आणि अंदमान निकोबार बेटे खडढ-२ चे अनुसरण करतील आणि उर्वरित देश खडढ-२ चे अनुसरण करतील. जगातील अनेक देश वेगवेगळ्या टाइम झोनचे पालन करतात. असे झाल्यास मोठ्या प्रमाणात ऊर्जेची बचत होईल. नवीन टाइम झोनमध्ये आणखी एक प्रयोगशाळा सुरू करावी लागेल.

प्रत्येक देशाची एक प्रमाणित वेळ असते, जी अक्षांश आणि रेखांशातील फरकाच्या आधारे ठरवली जाते. भारतातील अधिकृत प्रमाण वेळ प्रयागराजला केंद्रस्थानी ठेवून ठरवली जाते. हे दिल्लीतील राष्ट्रीय भौतिकशास्त्र प्रयोगशाळेद्वारे निश्चित केले जाते. भारतासाठी १९०६ पासून एक वेळ क्षेत्र वैध आहे. तथापि, त्या वेळी कोलकाता अपवाद होता, जेथे १९४८ पर्यंत स्वतंत्र अधिकृत वेळ निश्चित करण्यात आली होती.

यामागे १८८४ साली वॉशिंग्टन परिषदेत जगातील सर्व टाइम झोनमध्ये एकसमानता आणण्यासाठी भारतासाठी दोन टाइम झोन ठरवण्यात आले. म्हणून, कोलकाता हा दुसऱ्या मान्यताप्राप्त टाइम झोनचा एक भाग मानला गेला, जो नंतर रद्द करण्यात आला.

जगातील इतर अनेक देशांमध्ये वेगवेगळे टाइम झोन मानले जातात. फ्रान्समध्ये १२ टाइम झोन आहेत. रशियामध्ये ११ आणि ब्रिटन आणि अमेरिकेत प्रत्येकी नऊ टाइम झोन आहेत. अंटार्क्टिकामध्ये दहा आणि ऑस्ट्रेलियामध्ये आठ टाइम झोन आहेत. डेन्मार्कसारखे छोटे देशही पाच टाइम झोन वापरतात. टाइम झोन हा नैसर्गिक बदल नाही, तो मानव करू शकतो, जसे भारतातील राष्ट्रीय भौतिकशास्त्र प्रयोगशाळेने देशासाठी दोन टाइम झोनची संकल्पना मांडली आहे.

## जर ही कागदपत्रे गाडीत नसतील, तर पोलीस वसूल करु शकतात मोठा दंड, लगेच तयार राहा

बरेच लोक, घाईत किंवा निष्काळजीपणामुळे, त्यांच्या कारमध्ये महत्वाची कागदपत्रे न ठेवता घर सोडतात. आता आम्ही घरातून बाहेर पडता, पण रस्त्यावरील वाहतूक पोलिसांपासून वाचू शकत नाही. तुमच्या या छोट्याशा चुकीमुळे तुमचे हजारो रुपयांचे नुकसान होऊ शकते. वास्तविक, वाहतुकीचे नियम केवळ तुमच्या सुरक्षिततेसाठी बनवले जातात. जर तुम्ही त्यांचे पालन केले नाही तर तुम्ही स्वतःला आणि इतरांनाही धोक्यात आणता.

घरातून बाहेर पडण्यापूर्वी तुम्ही तुमच्या कारमध्ये कोणती कागदपत्रे ठेवावीत, हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत, जर तुम्ही ही कागदपत्रे




तुमच्या कारमध्ये न ठेवल्यास तुम्हाला किती पैसे गमवावे लागू शकतात हे जाणून घ्या. जर तुम्ही गाडी रस्त्यावर नेत, असाल तर कागदपत्रे विसरू नका घरी. यामध्ये तुमचा ड्रायव्हिंग लायसन्स, कारची आरसी, इन्शुरन्सची कागदपत्रे आणि पीयूसी यासारखी इतर कागदपत्रे कारमध्ये ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जर ही कागदपत्रे तुमच्या कारमध्ये सापडली नाहीत, तर तुमच्याकडून मोठा दंड वसूल केला जाऊ शकतो.

तुमची कार थांबवल्यानंतर, ट्रॅफिक पोलीस प्रथम तुमचे ड्रायव्हिंग लायसन्स विचारतात. जरी तुमच्याकडे इतर कागदपत्रे असली, तरी ऊ्ङ नसेल, तर पोलीस तुमच्याकडून मोठा दंड वसूल केला जाऊ शकतो. ड्रायव्हिंग लायसन्सशिवाय मुंबईत ५,००० रुपयांचे चलान जारी केले जाऊ शकते. परवान्यासोबतच गाडीमध्ये वाहन नोंदणी प्रमाणपत्र देखील असले पाहिजे, नोंदणी प्रमाणपत्र म्हणजे आर.सी. या प्रमाणपत्रावर कार मालकाचे नाव, कारचे नाव, नोंदणी क्रमांक इत्यादी तपशील समाविष्ट आहेत. जर तुमच्याकडे नोंदणी प्रमाणपत्र नसेल तर तुम्हाला १०,००० रुपये दंड किंवा ६ महिने तुरुंगवासही होऊ शकतो. जर तुम्ही ही चूक पुन्हा केली, तर तुम्हाला १५,००० रुपये दंड भरावा लागू शकतो किंवा २ वर्षांचा तुरुंगवासही होऊ शकतो.


तुमच्याकडे दुचाकी असो वा चारचाकी, पीयूसी प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. इड ३ किंवा त्यापेक्षा कमी इंजिन असलेली कार चालवणाऱ्या व्यक्तीकडे झणउ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. वेळेनुसार त्याचे नूतनीकरण करण्याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे. कारचा विमा असणे गरजेचे आहे. तुमच्या कारचा विमा उतरवला नसेल, तर तुमचे नुकसान होऊ शकते. जर गाडीचा विमा उतरवला नसेल, तर पोलिस २००० रुपयांचा दंड वसूल करु शकतात.

## AI ने वाचवला ४ वर्षांच्या मुलाचा जीव, लावला डॉक्टरांना देखील सापडत नसलेल्या आजाराचा शोध

कृत्रिम बुद्धिमत्ता वैद्यकीय क्षेत्रात दररोज नवनवीन चमत्कार करत आहे, अवघ्या महिन्याभरापूर्वी एआय शस्त्रक्रियेने लाँग आयलंडमधील एका अर्धांगवायू झालेल्या एकाचा जीव वाचवला होता. आता एआयने चार वर्षांच्या मुलामध्ये असा आजार शोधला आहे, जो अनेक डॉक्टरांच्या टीमलाही सापडला नाही. डॉक्टरांनी -ख कडून मिळालेल्या सूचनांकडे लक्ष दिले आणि मुलावर उपचार सुरू केले आणि काही दिवसातच परिणाम दिसू लागला.

हे प्रकरण अमेरिकेत उघडकीस आले आहे, येथे राहणारी कर्टनी आपला मुलगा अलेक्सच्या विचित्र आजाराने त्रस्त होती, मुलाला नीट बसता येत नव्हते. त्याला एवढी दातदुखी होती की तो जोरजोरात ओरडायचा आणि सर्व काही चावण्याचा प्रयत्न करायचा. मुलाच्या विकासावरही सातत्याने परिणाम होत होता. कर्टनी त्याच्यावर बरेच दिवस उपचार करत होती, पण यश मिळत नव्हते, पण आर्टिफिशियल इंटेलिजन्सने सांगितले की मुलाला न्यूरोलॉजिकल सिंड्रोम टेथर्ड कॉर्ड असू शकतो. आता मुलाची प्रकृती सातत्याने सुधारत आहे.

कर्टनी आपल्या मुलासह सुमारे १७ डॉक्टरांकडे गेली, डॉक्टरांची टीम देखील निष्कर्षापर्यंत पोहोचू शकली नाही की मुलाला काय समस्या आहे? कर्टनीच्या म्हणण्यानुसार, मुलाला वेदनांपासून वाचवण्यासाठी, ती




त्याला दररोज पेन किलर देत होती, टुडे डॉट कॉमच्या रिपोर्टनुसार, ती सतत डॉक्टरांकडे जात होती, पण यश मिळत नव्हते, डॉक्टरांनी याचे कारण कोविडचा प्रभाव सांगायचे. सर्व प्रयत्न करुन थकल्यानंतर कोर्टनीने या आजाराबद्दल ऑनलाइन शोध सुरू केला. दरम्यान, यासाठी चॅटजीपीटीची मदत का घेऊ नये, असा विचार तिच्या मनात आला.

कोर्टनी ChatGPT मध्ये अॅलेक्सच्या लक्षणांचे दस्तऐवजीकरण केले, MRI अहवाल शेअर केला. अॅलेक्समधील सर्वात मोठे लक्षण हे होते की त्याच्या उजव्या आणि डाव्या शरीरात असंतुलन होते, तो पाय रोवून बसू शकत नव्हता. ChatGPT ने लक्षणे समजून घेतली आणि सुचवले की हे एक न्यूरोलॉजिकल सिंड्रोम असू शकते, ज्याला टेथर्ड कॉर्ड म्हणतात. हे पाठीच्या कण्याशी जोडलेले आहे. लवकरच, कर्टनीने न्यूरोसर्जनची भेट घेतली आणि त्याचा वैद्यकीय इतिहास आणि ChatGPT कडून तिला मिळालेल्या सूचना स्पष्ट केल्या. न्यूरोसर्जनने या दिशेने उपचार सुरू केले आणि आता अॅलेक्स पूर्वीपेक्षा बरा आहे.

अवघ्या महिन्याभरापूर्वी अमेरिकेतील लाँग आयलंडमध्ये AI शस्त्रक्रियेच्या मदतीने अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीचे प्राण वाचवण्यात आले. खरं तर, तीन वर्षांपूर्वी इथे राहणाऱ्या थॉमस यांची पूलमध्ये डुबकी मारताना मान आणि मणका तुटला, त्यामुळे त्यांच्या मानेच्या खालच्या भागाला अर्धांगवायू झाला. मॅनहॅसेट, न्यूयॉर्कमधील फीनस्टाईन संस्थेने त्याच्या शस्त्रक्रियेसाठी एआयची मदत घेतली. सर्वप्रथम, त्याचा मेंदू संगणकाशी जोडला गेला, जेणेकरून त्याच्या क्रियाकलापांवर पूर्णपणे लक्ष ठेवता येईल. संस्थेचे संचालक डॉ. आशेष मेहता यांच्या मते, ही शस्त्रक्रिया अशी होती की थॉमसला जागृत राहणे आवश्यक होते आणि त्याच्या मेंदूवरही प्रत्येक क्षणी लक्ष ठेवणे आवश्यक होते, एआयने यामध्ये खूप मदत केली, जो भविष्यात एक सकारात्मक संदेश आहे.




## कुठे बनवले जाते प्रदूषण प्रमाणपत्र? कोणत्या काळात अपडेट करणे आहे आवश्यक

PUC प्रमाणपत्र हे एक वैध दस्तऐवज आहे, जे सिद्ध करते की तुमच्या वाहनाची उत्सर्जन पातळी सरकारने ठरवलेल्या पातळीनुसार आहे. किंबहुना, आजकाल वाढते प्रदूषण आणि रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची संख्या पाहता, त्यांच्या उत्सर्जनाच्या पातळीचे निरीक्षण आणि नियंत्रण यंत्रणेद्वारे करण्याची गरज आहे.

यासाठी, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र किंवा झणउ प्रमाणपत्र भारत सरकारने केंद्रीय मोटर वाहन नियम, १९८९ अंतर्गत प्रत्येक वाहनाने उत्सर्जन मानकांचे पालन करणे अनिवार्य केले आहे. तुम्ही हे फक्त सरकारी अधिकृत चाचणी केंद्रांवरूनच करू शकता.

**अशा प्रकारे बनवा पीयूसी प्रमाणपत्र**

प्रदूषण चाचणीसाठी तुमचे वाहन स्थानिक आरटीओ किंवा प्रदूषण चाचणी केंद्रात घेऊन जा.

अधिकृत चाचणी करणारी व्यक्ती कार/बाईकच्या इंजेक्शन पाईपमधून उत्सर्जन पातळी तपासून चाचणी सुरू करेल.

जेव्हा ऑपरेटर वाहनाच्या नोंदणी क्रमांक प्लेटचा फोटो घेतो, तेव्हा तुमचे पीयूसी प्रमाणपत्र तयार होते. फी भरल्यानंतर तुम्ही पीयूसी प्रमाणपत्र घेऊ शकाल.

अशा प्रकारे डाउनलोड करा PUC प्रमाणपत्र

वाहन वाहतूक पोर्टलवर जा, आता PUC प्रमाणपत्राच्या पर्यायावर क्लिक करा.

वाहन नोंदणी क्रमांक आणि चेसिस क्रमांक प्रविष्ट केल्यानंतर, सुरक्षा कोड प्रविष्ट करा. यानंतर झणउ तपशीलावर क्लिक करा.

आता तुम्ही येथून झणउ प्रमाणपत्र डाउनलोड करू शकता.

नवीन कार किंवा बाईकसाठी PUC प्रमाणपत्र एक वर्षासाठी वैध आहे, त्यानंतर ते वेळोवेळी अपडेट करणे आवश्यक आहे. नूतनीकरणानंतर, हे प्रमाणपत्र ६ महिन्यांसाठी वैध असते.

PUC प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तुम्हाला फक्त ६० ते १०० रुपये मोजावे लागतील. PUC प्रमाणपत्राची किंमत राज्यानुसार बदलू शकते. या सोप्या प्रक्रियेचे अनुसरण केल्यानंतर, तुमचे PUC प्रमाणपत्र तयार केले जाईल आणि त्याचे नूतनीकरण देखील केले जाईल. यानंतर, तुमच्या पीयूसी प्रमाणपत्रामुळे वाहतूक पोलिस चलान जारी करणार नाहीत.

## तुमची देखील मासिक पाळी ७ दिवसांपेक्षा जास्त असते का? झाला आहे हा आजार

आजच्या काळात महिलांना मासिक पाळीशी संबंधित अनेक समस्या भेडसावत आहेत. मासिक पाळी वेळेवर न येणे, जास्त रक्तस्राव, मासिक पाळी लांबणे अशा समस्या वाढत आहेत. साधारणपणे महिलांमध्ये मासिक पाळी तीन ते पाच दिवस टिकते. काही स्त्रियांमध्ये ती सात दिवस टिकते. परंतु जर ते ७ दिवसांपेक्षा जास्त काळ चालू राहिले, तर ते हलक्या घेऊ नका. हे दोन ते चार महिन्यांतून एकदा होऊ शकते, परंतु जर दर महिन्याला ही समस्या उद्भवत असेल, तर समजून घ्या की आता तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. विशेषत: या काळात जर जास्त प्रमाणात रक्तस्राव होत असेल, तर ते एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण असू शकते.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार काही महिलांमध्ये मासिक पाळी सात दिवस टिकू शकते, परंतु जर यापेक्षा जास्त काळ होत असेल, तर आरोग्याकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे. जर पूर्वी तुमची मासिक पाळी पाच दिवसांत संपत असे आणि आता ती सात दिवसांपेक्षा जास्त असेल आणि असे दर महिन्याला होत असेल, तर या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे. हे एक चिंताजनक लक्षण असू शकते. यावरून शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बरोबर नसल्याचे सूचित होते. जे नंतर अनेक आजारांचे कारण बनू शकते.

याबाबत स्त्रीरोग तज्ज्ञ सांगतात की, जर मासिक पाळी ७ दिवसांपेक्षा जास्त काळ येत असेल, तर ते अनेक आजारांचे लक्षण असू शकते. या काळात जास्त रक्तस्राव होत असेल, तर प्रथम तपासणी करून घ्यावी. चाचणीमध्ये रक्तस्राव विकार आढळल्यास, त्यावर उपचार करा. या आजारावर औषधांद्वारे सहज उपचार करता येतात. जर रक्तस्रावाचा विकार नसेल, तर दीर्घकाळ राहणे हे या तीन रोगांचे लक्षण असू शकते.

फायब्रॉइड : सात दिवसांपेक्षा जास्त काळ टिकणारा कालावधी हे गर्भाशयातील फायब्रॉइड्स (लम्प्स) चे लक्षण आहे. गर्भाशयात फायब्रॉइड तयार होणे ही नंतर एक गंभीर समस्या बनू शकते. यामुळे कॅन्सर होण्याचाही धोका असतो.

थायरॉईड : काही स्त्रियांमध्ये, थायरॉईड रोगामुळे मासिक पाळी जास्त काळ टिकू शकते. ही समस्या कायम राहिल्यास थायरॉईडची तपासणीही करून घ्यावी.

गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग : फायब्रॉइड्समुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे पोटाच्या खालच्या भागात वेदना होतात. महिलांमध्येही पीरियड्स जास्त काळ टिकू शकतात. ४५ वर्षांवरील महिलांमध्ये ही समस्या अधिक दिसून येते.

या गोष्टी लक्षात ठेवा

जर मासिक पाळी सात दिवसांपेक्षा जास्त काळ चालू असेल, तर डॉक्टरांकडून तपासणी करा.

मासिक पाळी दरम्यान आहार आणि जीवनशैलीची काळजी घ्या.

खालच्या ओटीपोटात वेदना हलक्यात घेऊ नका

जास्त रक्तस्राव होत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## डेंग्यूमध्ये कधी भासते रक्त चढवण्याची गरज, किती असावेत प्लेटलेट्स?

देशातील अनेक राज्यांमध्ये डेंग्यूची साथ पसरत आहे. एडिस डासामुळे होणाऱ्या या आजाराच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या तापामुळे पश्चिम बंगालपासून तामिळनाडू आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत समस्या निर्माण होत आहेत. या आजारामुळे रुग्णांनाही आपला जीव गमवावा लागत आहे. बहुतांश लोक डेंग्यूने काही दिवसात बरे होत आहेत, मात्र काही रुग्णांमध्ये या तापामुळे प्लेटलेट्सची पातळी घसरत आहे. अशा स्थितीत प्लेटलेट्सची पातळी योग्य पातळीवर ठेवता यावी, यासाठी रुग्णाला रक्त चढवले जात आहे, मात्र यादरम्यान डेंग्यूच्या रुग्णातील प्लेटलेट्सची पातळी काय असावी, हे जाणून घेणेही महत्त्वाचे आहे. ही माहिती महत्त्वाची आहे कारण प्लेटलेट कमी झाल्यावर रुग्ण घाबरून जातो. ज्यामुळे खूप त्रास होऊ शकतो.

काही लोकांना असे वाटते की १ लाख प्लेटलेट्स सुद्धा धोक्याची बाब आहे, पण खरंच असे आहे का? प्लेटलेट्स किती आहेत आणि किती कमी हे धोक्याचे लक्षण आहे, ते आम्ही तुम्हाला सविस्तरपणे सांगतो. वास्तविक, सामान्य माणसाच्या शरीरात ३ ते ४ लाख प्लेटलेट्स असतात. डेंग्यूमध्ये ते १ लाख किंवा ५० हजारांपर्यंत कमी होते, परंतु ही धोक्याची बाब नाही. प्लेटलेट्स किती असावेत आणि




कमी झाल्यास डेंग्यूचा धोका वाढतो, हे तज्ज्ञ डॉक्टरांकडून जाणून घेऊया.

याबाबत तज्ज्ञ सांगतात की, जर रुग्णाच्या प्लेटलेट्स ५० हजारांपर्यंत असतील, तर काळजी करण्याची गरज नाही. प्लेटलेट्स १० हजारांपेक्षा कमी झाल्यास धोका असतो, मात्र, जर एखाद्या रुग्णाला रक्तस्राव होत असेल, तर डॉक्टर परिस्थितीनुसार प्लेटलेट्स बदलण्यास सांगू शकतात, अशा परिस्थितीत रुग्णाला रक्ताची आवश्यकता असते.

पण असे दिसून येते की काही लोक १ लाख किंवा ५० हजार प्लेटलेट्स असल्यासच घाबरतात. यामध्ये घाबरण्याची गरज नाही. डेंग्यूची गंभीर लक्षणे नसतील आणि रक्तस्राव होत नसेल, तर १० हजार प्लेटलेट्स असले तरी धोका नाही.

डेंग्यूच्या धोकादायक लक्षणांबद्दल लोकांना जागरुक असणे महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला अशी कोणतीही समस्या येत असेल, तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

ही आहेत डेंग्यूची धोकादायक लक्षणे

हिरड्या रक्तस्राव

१०० अंशांपेक्षा जास्त सतत ताप

शरीरावर पुरळ

उलट्या आणि अतिसार

या लोकांना जास्त धोका असतो

लहान मुले

वृद्ध

एड्स रुग्ण

बीपी रुग्ण

## श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात या २ खेळाडूंवर टांगती तलवार, एकालाच मिळणार संधी

टीम इंडियाने आशिया कप-२०२३ च्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. या जेतेपदाच्या लढतीत भारताचा सामना रविवारी मागील विजेत्या श्रीलंकेशी होईल, ज्याने पाकिस्तानचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारतासाठी ही फायनल खूप महत्त्वाची आहे. टीम इंडियाने बऱ्याच काळापासून कोणतेही विजेतेपद जिंकलेले नाही. २०१८ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेच्या नेतृत्वाखाली आशिया कप जिंकला होता, परंतु त्यानंतर टीम इंडियाला एकही बहु-सांघिक स्पर्धा जिंकता आलेली नाही. याशिवाय, पुढील महिन्यात एकदिवसीय विश्र्वचषकही सुरू होत आहे, हे लक्षात घेता ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची आहे. या फायनलपूर्वी टीम इंडियाच्या दोन खेळाडूंवर निवडीची टांगती तलवार आहे. शार्दुल ठाकूर आणि अक्षर पटेल असे हे दोन खेळाडू आहेत.

बांगलादेश विरुद्ध खेळल्या गेलेल्या आशिया चषक-२०२३ च्या सुपर-४ च्या शेवटच्या सामन्यात भारताने प्लेईंग-११ मध्ये पाच बदल केले. या सामन्यात बांगलादेशने भारताचा सहा धावांनी पराभव केल्यामुळे टीम इंडियाला इतके प्रयोग करताना नुकसान सहन करावे लागले. ठाकूर आणि अक्षर दोघेही या सामन्यात खेळले.

मात्र, फायनलमध्ये टीम इंडिया बांगलादेशविरुद्ध संधी मिळालेल्या खेळाडूंना माघारी बोलावणार आहे. मात्र ठाकूर आणि पटेल यांच्यापैकी एकच बाहेर जाणार आहे. हे दोघेही अष्टपैलू खेळाडूंच्या भूमिकेत आहेत आणि त्यांच्या उपस्थितीमुळे संघाच्या फलंदाजीला खोली मिळेल. त्यामुळे त्यापैकी एकाची खेळी निश्चित आहे. भारताने बांगलादेशविरुद्ध जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांना विश्रांती दिली आणि प्रसिध्द कृष्णा आणि मोहम्मद शमीची निवड केली. पण बुमराह आणि सिराज अंतिम फेरीत परततील. तसेच कुलदीप यादवही या सामन्यात खेळला नसल्याने त्याचे अंतिम फेरीत पुनरागमनही निश्चित आहे.

## तुमच्या फोनची बॅटरीचा होईल बॉम्बसारखा स्फोट, आजच बदला या ३ सवयी

आजकाल उष्णतेने माणसांनाच नाही, तर तुमच्या फोनलाही त्रास दिला आहे. अशा वातावरणात स्वत:ची तसेच तुमच्या फोनची काळजी घेणे खूप गरजेचे झाले आहे. तुम्हाला माहीत आहे का की तुमच्या काही चुका तुम्हाला महागात पडू शकतात? या चुकांमुळे फोनला आग लागू शकते आणि तुमच्या फोनचा स्फोटही होऊ शकतो. तुमच्यापैकी बऱ्याच जणांना माहित नसेल की फोन चार्ज करताना काळजी घेतली नाही, तर ते तुमचे भयंकर नुकसान करू शकते. होय, आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की तुमच्या कोणत्या चुकांमुळे तुमचा फोन ब्लास्ट होऊ शकतो.

अनेक अहवालांनुसार, केवळ मानवच नाही, तर फोन देखील उष्णतेच्या लाटेचा बळी ठरत आहेत, अशा परिस्थितीत वापरकर्त्यांनी फोन वापरताना नेहमी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अन्यथा तुमच्या फोनची बॅटरी बॉम्बसारखी फुटू शकते.

**फोन वापरताना या चुका करणे टाळा**

आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे, अनेक फोन उष्णतेच्या लाटेमुळे खराब होतात, त्यानंतर स्फोट होण्याचा धोका वाढतो. हे तुमच्यासोबत होऊ नये म्हणून, तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की तुम्हाला तुमचा फोन थेट सूर्यप्रकाशात ठेवणे टाळावे लागेल. फोन थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यास तो जास्त गरम होऊ शकतो. फोन जास्त गरम होणे म्हणजे स्फोट होण्याचा धोका वाढतो.



रात्रभर फोन चार्ज करणे टाळा, खरं तर फोन रात्रभर चार्ज केल्याने तुमचा फोन जास्त गरम होऊ शकतो. यामुळे तुमच्या डिव्हाइसचे नुकसान होऊ शकते. सध्या बाजारात येणाऱ्या सर्व स्मार्टफोन्समध्ये पूर्ण चार्ज केल्यावर ऑटो-कट करण्याची सुविधा असली, तरी जुन्या फोनमध्ये अजूनही या वैशिष्ट्याचा अभाव आहे. अशा परिस्थितीत तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे आणि फोन जास्त वेळ चार्ज करणे टाळावे.

तुमच्या फोनचा प्रोसेसर ओव्हरलोड करणे देखील तुमच्यावर ओझे ठरू शकते, तुम्ही तुमच्या फोनवर हेवी अॅप्स आणि गेम्स मर्यादेपलीकडे इन्स्टॉल करणे टाळावे, यामुळे फोन हँग होण्याची समस्या तर निर्माण होतेच पण त्यामुळे प्रोसेसरवरही भार पडतो. तुमचा फोन वापरल्यानंतर थोडी विश्रांती द्या.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770




# बटाटा पिकावरील करपा रोग, अशा पद्धतीने करा एकात्मिक व्यवस्थापन

बटाटा पिकावर सगळ्यात महत्वाचे दोन रोग म्हणजे करपा रोग होय.या करपा रोगा मध्ये दोन प्रकार येतात.एक म्हणजे उशिरा येणारा करपाआणि दुसरा म्हणजे लवकर येणारा करपा. या लेखामध्ये आपण या रोगाविषयी माहिती व त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन कसे करावे ते जाणून घेऊ.

उशिरा येणारा करपा: बटाटा पिकात उशिरा येणारा करपा हा रोग फायटोप्थोराइन्फेस्टेन्सनावाच्या बुरशीमुळे होतो.या रोगाच्या प्रादुर्भावामुळे बटाटा पिकात पानावर पाणथळ फिकट तपकिरी गोलाकार ठीपके दिसून येतात. ढगाळ व पावसाळी थंड वातावरणात या रोगाचे प्रमाण जास्त वाढतेआणि पाने करपून गळतात. ढगाळ हवामानात सर्वप्रथम पानाच्या खालच्या बाजूस बुरशीची पांढरट वाढ झालेली दिसून येते. बटाट्यावर सुद्धा हा रोग होऊन बटाटे तपकिरी जांभळट रंगाचे होतात. त्यामुळे बटाटे मलूल होऊन काढणीपूर्वी कुजतात. या रोगाची बुरशी म्हणजे रोगग्रस्त बटाटे जमिनीत सुप्तावस्थेत राहतेआणि यानंतर पाऊस वारा आणि पाण्याद्वारे या रोगाचा प्रसार होतो.

लवकर येणारा करपा– बटाटा पिकात लवकर येणारा करपा हा रोग अल्टरनेरिया सोलेनी या बुरशीमुळे होतो.बटाटा पिकात लवकर येणारा करपा या रोगाच्या बुरशीमुळे पानावर गोलाकारतपकिरी काळसर रंगाचे वलयांकित ठिपके दिसतात.रोगाचे प्रमाण जास्त असल्यास पाने करपून गळतात.बटाटे तपकिरी काळे पडून कुजतात. या रोगाचा प्रादुर्भाव झालेले बटाटे साठवणुकीत



सडतात.या रोगाच्या प्रादुर्भावामुळे बटाट्याच्या उत्पादनात घट येते.

अशा पद्धतीने करा करपा रोगासाठी एकात्मिक व्यवस्थापन

१–बटाटा पिकानंतर टोमॅटो आणिटोमॅटो पिकानंतर बटाटा पीक घेणे टाळावे.

लागवडीसाठी रोगमुक्त बियाण्याचा म्हणजे रोगमुक्त बटाट्याचा वापर करावा.

लागवड करताना तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली रोग प्रतिकारक जातींचा वापर करावा.

पीक तणविरहित ठेवावे.

बटाटा वरील करपा या रोगाच्या व्यवस्थापनासाठी या रोगाचा प्रादुर्भाव दिसताच योग्य निदान करून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खालील पैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची निर्देशित प्रमाणातफवारणी करावी.आवश्यकतेनुसार पुन्हा एकदा बुरशीनाशक बदलून पंधरा दिवसांनी फवारणी करावी.

क्लोरोथलोनील ७५ टक्के थझ २५ ग्रॅम अधिक दहा लिटर पाणी किंवाप्रोबिन्याब७० टक्के थझ३० ग्रॅम अधिक दहा लिटर पाणी किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के थझ २५ ग्रॅम अधिक दहा लिटर पाणी किंवा मेटलॅक्सिल८ टक्के+ मॅन्कोझेब ६४ टक्के थझ संयुक्त बुरशीनाशक २५ ते ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी फवारावे. वरील फवारणी करताना तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

# योग्य नियोजन करून शेतामध्ये लावा पपई, वर्षाकाठी मिळवा १५ लाखाचे उत्पन्न



आपला भारत देश हा एक कृषी प्रधान देश आहे. बहुतांशी लोकांचा व्यवसाय हा शेती आहे. बरेच लोक शेती करून उत्पन्न मिळवत आहेत. आपल्याकडे बरेच लोक शेती ही पारंपरिक पद्धतीने करतात त्यामुळे उपन्न कमी प्रमाणात मिळत आहे.शेतकरी वर्गाने जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या शेतातील पिकाचे उत्पादन वाढवावे तसेच ज्वारी बाजरी गहू या व्यतिरिक्त शेतामध्ये नगदी पिकांची लागवड करावी त्यामध्ये ऊस कापूस कांदा इत्यादी.

उत्पादन हे १५ लाख रुपयापर्यंत मिळत राहते:

एवढेच न्हवे तर फळबाग लावून सुद्धा तुम्ही लाखो रुपयांचा फायदा मिळवू शकता. फळबागेत पपई ची लागवड करून सुद्धा तुम्ही भरघोस उत्पन्न मिळवू शकता.पपई शेती हा फायद्यासाठी सर्वात उत्तम पर्याय आहे. एकदा रानात पपईची लागवड केली की कमीत कमी २–३ वर्षे आपल्याला फळे मिळतात आणि लागोपाठ आपले उत्पन्न चालू राहते.जरी फळझाडांची पडझड झाली किंवा काही रोगराई आली पपई चे वार्षिक उत्पादन हे १५ लाख रुपयापर्यंत मिळत राहते.पपई या फळाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे कारण पपई ही कच्ची जरी असली तरी वापरता येते आणि परीपक्व झाल्यावर सुद्धा त्याचा उपयोग केला जातो.

परिपक्व पपई चा उपयोग शिजवलेल्या फळांमध्ये समावेश करण्यासाठी केला जातो.तसेच कच्चा पपईची छान अशी भाजी सुद्धा बनविली जाते. यातून आपल्याला ‘अ’ जीवनसत्त्व आणि ‘व्हिटॅमिन सी’ ही जीवनसत्त्वे मिळतात. यामध्ये मूळ जातींसह विदेशी जातींचा समावेश आहे. आपल्या रानात पपई ची लागवड करण्यापूर्वी काही प्रमुख आणि मुख्य पपई च्या जाती माहित असणे खूप गरजेचे आहे.

विविध प्रकारच्या पपई च्या जाती:– पुसा तीनी:– एका पपई च्या वनस्पतीतून आपल्याला २५ ते ३० किलो पपईचे उत्पन्न मिळते. पपई च्या या जातीची फळे आकाराने मध्यम किंवा लहान आकाराची असतात. तसेच या वाणाच्या वनस्पतींची उंची कमीत कमी १२० सेंमी.च्या जवळपास आहे.

पुसा जायंट :–या जातीची फळे आकाराने मोठी असतात. या जातीच्या पपई चा उपयोग भाज्या आणि पेटा बनवण्यासाठी केला जातो. या वाणाच्या पपई तुन आपण ३० –३५ किलो फळांचे उत्पादन मिळवू शकतो. या पपई च्या प्रजातीच्या वनस्पती ९२ सेंटीमीटर झाल्यावर फळ देण्यास सुरुवात होते.

पुसा डेलिसियास:– फळ क्षमता:–४० ते ५० किलो

सुर्या :– ही एक पपई ची प्रमुख संकरित जात आहे. त्यातील एका फळाचे वजन हे कमीत कमी ५५० ते ६५० ग्रॅम एवढे आहे. या जातीच्या रोपातून आपण ५५ –५६ किलो फळांचे उत्पादन मिळवू शकतो.

पपई च्या वाणाच्या जातीची लागवड करून आपण वर्षाकाठी १५ लाख रुपयांपर्यंत कमवू शकतो आणि आपले उत्पन्न वाढवू शकतो. फळ शेतीतून मिळालेले उत्पन्न आणि हा नफा हा बक्कळ स्वरूपाचा असल्यामुळे फळ शेती करणे ही खूप गरजेचे आहे.तसेच फळशेती करताना तुम्ही त्या फळांच्या बागेत आंतरपीक पीक पद्धतिने दुसरी वेगवेगळी पिके सुद्धा घेऊ शकता. किंवा फुलशेती करून सुद्धा चांगले पैसे कमवू शकता.

# अशा पद्धतीने करा शेवंती लागवड, जाणून घ्या तंत्रज्ञान



शेवंती हे फुल गुलाब नंतर सगळ्यात महत्त्वाचे फुल आहे. शेवंती या फुलाला फुलांची राणी असे म्हणतात कारण या फुलाचा रंग,आकार आणि उमलण्याची पद्धतइतर फुलांपेक्षा फार वेगळी आहे.चीन के शेवंतीचे उगमस्थान असले तरी शेवंतीचा जगभर प्रसार जपानमधून झाला आहे. या लेखात आपण शेवंती लागवडीच्या तंत्रज्ञानाविषयी माहिती घेऊ.

**शेवंतीची लागवड तंत्रज्ञान**

**शेवंती साठी जमिनीची निवड**

या पिकासाठी योग्य जमिनीची निवड नेहमीच फायदेशीर ठरते.ज्या जमिनीचा सामू साडेसहा ते सात आहे,अशी जमीन लागवडीसाठी चांगली असते. मध्यम हलकी,पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तसेचभरपूर सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. जर पावसाळ्यात जास्त काळ पाणी साठवून राहत असेलतर शेवंती पिकाचे नुकसान होऊ शकते.म्हणून पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी.

**लागणारे हवामान**

शेवंती हे लहान दिवसांचे पिक आहे.म्हणजे शेवंतीला फुले येण्यासाठी लहान दिवस व कमी तापमानाची आवश्यकता असते.सुरुवातीला भरपूर सूर्यप्रकाश व मोठा दिवस असणे आवश्यक आहे. शेवंतीच्या वाढीसाठी वीस ते तीसअंश सेंटिग्रेड तर फुले येण्यासाठी १० ते १७ अंश सेंटिग्रेड तापमानाची आवश्यकता असते.हवामानात जास्त आद्रता व भरपूर पडणारा पाऊस या पिकाला मानवत नाही.

**३–शेवंती लागवडीपूर्वी जमिनीची तयारी कशी करावी?**

लागवड करण्याआधी सर्वप्रथम जमीन उभी–आडवी नांगरूनव कुळवून भुसभुशीत करावी. जमीन तयार करताना हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. जमिनीच्या उताराला आडव्या ६० सेंटिमीटर अंतरावर सऱ्या सोडून वाफे तयार करावेत.लागवडीसाठी मागील हंगामातील शेवंती पिकाच्याकाश्ययावापराव्यात. लागवड ही सरीच्या दोन्ही बाजूस ३० सेंटिमीटर अंतरावरबगलेत करावी.लागवड शक्यतो दुपारचं ऊन कमी झाल्यावर करावी.म्हणजे रोपांची मर होत नाही.

**४–शेवंती पिकाची जाति**

जगात शेवंतीच्या पंधरा ते वीस हजार जाती असूनभारतात सुमारे पाचशे जाती आढळतात.महाराष्ट्रात सोनाली तारा, बग्गी,झीप्री,राजा, पांढरी व पिवळी रेवडी, शरदमाला, बंगळुर, रतलाम त्याची जाती लागवडीखालील आहे.

**५– आवश्यक खते**

शेवंतीच्या उत्तम वाढीसाठी आणि दर्जेदार उत्पादनासाठी लागवडीपूर्वी जमीन तयार करताना हेक्टरी २५ ते ३० टन शेणखत जमिनीत मिसळावे.लागवडीच्या वेळेस फॅक्टरी १५०:२००:२०० किलो अनुक्रमे नत्र, स्फुरद, पालाश तर लागवडीनंतर एक ते दीड महिन्याने दीडशे किलो नत्र हेक्टरी याप्रमाणे द्यावे.

**६– पाणी व्यवस्थापन**

लागवड उन्हाळी हंगामात करावयाची असल्याने पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी लागते.लागवडीपासून पाऊस सुरू होईपर्यंतपाच ते सात दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.त्यानंतर गरजेप्रमाणे पाणी देत रहावे. फुले येण्याच्या व फुलण्याच्या काळात पाण्याचा ताण पडणार नाही याची अवश्य काळजी घ्यावी.

हिवाळी हंगामात १२ ते १५ दिवसांनी जमिनीच्या मगदुराप्रमाणेगरजेप्रमाणे पाणी द्यावे. गरजेपेक्षा जास्त पाणी देऊ नये.जास्त पाणी झाल्यास मूळकूज रोग होतो.

**७– आंतरमशागत**

वेळोवेळी निंदणी करून पीक तणमुक्त ठेवावे.निंदनी मुळे जमीन भुसभुशीत राहून पिकांची जोमदार वाढ होते. झाडांची वाढ मर्यादित राहण्यासाठी आणि अधिक उत्पादनासाठी शेवंतीच्या झाडाचे शेंडे खुडण्याचा प्रघात आहे. शेंगा खुडण्याचे काम लागवडीनंतर साधारण चौथ्या आठवड्यानंतर करावे. शेंडा खुडन्याने अधिक फुटवे फुटून फुलांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदतहोते.

# कुतुहूल! जाणून घ्या गाई आणि म्हशीच्या वेतातील महत्वाचे दिवस

गाय किंवा म्हैस गाभण राहते त्यानंतर ती व्याते. व्यायल्यानंतर चिक देते व पाच ते सात दिवसांनी दूध देणे सुरू करते. एक वेत म्हणजे चांगल्या दूध देणाऱ्या गाई मध्ये ३०५ ते ३१० दिवस असतात तर म्हशींमध्ये २७० ते दोनशे १०



दिवस असतात. एकदा गाय किंवा म्हैस व्यायली किती पुन्हा गाभण राहून ज्या दिवशी परत वासरू किंवा रेडकु देते तो कालावधी म्हणजे दोन वेतामधील आंतर असते. दोन वेतांमधील अंतराचा कालावधी हा गाईंमध्ये १२ ते १३ महिन्यांचा असतो तर म्हशीमध्ये १३ ते १४ महिन्याचा असतो.

विण्याच्या अगोदर गायीच्या कासेला पंचेचाळीस दिवस विश्रांती मिळाली पाहिजे. त्यासाठी तिला संपूर्णपणे आटवली पाहिजे. आटवताना पाणी, खुराक, हिरवा चारा हळूहळू कमी करावा. तिच्या काशेत सडाच्या ट्यूबाभराव्यात. त्यामुळे कास एकदम आकुचित होते.मग तिचा आहार पुन्हा पहिल्यासारखा सुरू करावा. या ४५ दिवसांचे साधारणपणे तीन भाग पडतात. पहिल्या दहा दिवसात कासची काळजी घ्यावी. तिला आतून बाहेरून कोणत्याही प्रकारची इजा होऊ देऊ नये. त्यानंतरच्या ३० दिवसात तिला पचनीय आहार व व्यायाम मिळेल हे पाहावे.

म्हणजे गर्भाशयातील वासराचे वजन वाढते. २० दिवसांच्या अंतराने कृमी / जंतुनाशक औषधांच्या दोन डोस दिला द्यावेत. गाईच्या किंवा म्हशीच्या नख्या चांगल्या घासूनवा कापून सरळ काटकोनात कराव्यात. व्याय च्या अगोदर त्यांना संतुलित आहार द्यावा. विना अगोदरच्या पाच दिवसात त्यांना जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावी. त्यांना निसरड्या,जास्त उताराच्या, खड्डे असलेल्या जागी बांधणे,डोंगर, टेकड्या अशा जागी पाठवणे योग्य नाही. यांच्या बसण्या उठण्याच्या जागेवर गवताच्या, उसाच्या चीपाडच्यांची, गव्हाच्या काडाची,पेंड्याची किंवा अन्य सामग्री वापरून गादी करावी. तसेच त्यांना अत्यंत हलका आहार द्यायचा प्रयत्न करावा.

व्यायल्यानंतर पंचावन्न दिवसात गाय किंवा म्हशीला पौष्टिक आणि संतुलित आहार मिळाला पाहिजे. या दिवसात तिचे गर्भाशय पूर्वस्थितीत येऊन परत माजचक्र सुरू करण्याच्या तयारीत आणणे महत्त्वाचे असते. तिच्या गर्भाशयातून दहा ते बारा दिवस येणाऱ्या स्त्रावामुळे तिच्या शेपटीचा भाग घेऊन, निर्जंतुक रसायने वापरून दररोज स्वच्छ ठेवावा. त्यामुळे गर्भाशयाला इजा होत नाही.

# आता तरी शेतकऱ्यांचे डोळे उघडतील अशी आशा

देशातील महत्त्वाच पीक म्हणून सोयाबीनकडे शेतकऱ्यांचा कल वाढतं आहे. सोयाबीनला चांगला दर मिळेल म्हणून आशा निर्माण झाली असताना सोयाबीनचे भाव पडत आहेत. देशामध्ये जोपर्यंत मोदींच सरकार आहे तो पर्यंत शेतमालाची माती होणारं आहे हे सांगायला ज्योतिष्याची गरज नाही.

फक्त एकच माहिती सांगतो. देशात तेलबियांच्या व्यवसायात सगळ्यात मोठा ब्रँड म्हणजे फॉर्चुन आहे. हा ब्रँड आदानी ग्रुपचा आहे. हा ग्रुप खाद्यतेलाच्या मार्केटमध्ये शब्दशः दादागिरी करतो. देशांतर्गत शेतमालाचे भाव पाडून, पडलेल्या भावात शेतमाल खरेदी करून त्यावर प्रक्रीया उद्योग उभारून, भरमसाठ नफा कमवण्याचे उद्योग सध्या जोरात सुरू आहेत. सध्या सगळ्याच शेतकऱ्यांची अवस्था चक्रव्यूहमध्ये अडकलेल्या अभिमान्यू सारखी झाली आहे. शेतमाल पिकवण्यासाठी लागणाऱ्या खते, बियाणे, औषधं, औजारे, यंत्र, ते यंत्र चालण्यासाठी लागणारे इंधन (डिझेल) यांचे भाव गगनाला भिडले आहेत. मात्र त्याच वेळेस शेतमालाचे भाव मात्र संघटितपणे पाडण्याचं काम केले जात आहे. टोमॅटोचा लाल चिखलं नुकताच सगळ्यांनी पाहिला असेलच. अगदी मिरची, कांदा, भाजीपाला या पिकांचेही माती झालीय.

काही दिवसांपूर्वीच भुईमूगाच्या शेंगाचाही बाजार असाच पडला होता. मात्र शेंगतेलाचं दर मात्र दिवसेंदिवस चढेच होते. बाजारपेठेत कृत्रीम रित्या तुटवडा निर्माण करणे किंवा कृत्रिम रित्या पुरवठा वाढवणे ही खेळ मोठे मोठे उद्योजक खेळत असतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी बनवलेल्या यंत्रणा अशा उद्योजकांच्या रखेल असतात. कायद्याला



पायदळी तुडवत पैसे कमवाण्याचं नवं फॅशन वाढतं आहे. यात मात्र मरणं होते ते सर्व सामान्य शेतकऱ्यांच.

शेतकरी पोरांना नव्या कंपन्या स्थापन करून व्यवसाय करावा म्हणलं तर त्यासाठी लागणार भांडवलं कुठून उभे करायचं ? हा प्रश्न असतो. बँका शेतकऱ्यांना दारातही उभा करत नाहीत. यावर मी स्टींग ापरेशन केले होते. बँकेतील कर्मचारी शेतकऱ्यांना हाकलून लावतात. कर्जाचा मोबदल्यात पैसे मागतात. एकाने तर थेट शेतकऱ्यांच्या बायकोकडे शरिरसुखाची मागणी केली होती. त्याला स्वाभिमानीच्या बहाद्दरांनी तुडवला होता. असो तर बँकां सरकारच्या आदेशाला जुमानत नाहीत. बँकांच्या लेखी शेती आणि शेतकरी दुय्यम आहेत. शेतीसाठी औजारे घेण्यासाठी बँका वार्षिक १५% दराने भांडवलं देतात. चैन म्हणून फिरण्यासाठी कार घेत असाल तर त्याला ७% व्याज आकारले जाते. म्हणजे शासनाचा प्राधान्यक्रम समजतो.

सध्या सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकरी हवालदिल झालाय. शेतीची माती होण्याची सुरुवात यापुर्वीच झालीय. शेतकरी वैतागून आपली जमीन विकून टाकेल. त्या जमीवर मोठमोठ्या कंपन्या पुन्हा शेतीच करतील फरक येवढाचं की त्या शेतात ज्यांच्या जमिनी गेल्या ते शेतकरी मजूर म्हणून काम करतील. तुमच नव्या भारतात स्वागत आहे.

या सगळ्या विरोधात तुम्ही बोलला तर देशद्रोही ठरवले जालं. तुमच्यावर खटला दाखलं केला जाईल. तुम्हाला शत्रुराष्ट्राचे हस्तक ठरवलं जाईल. अनेक वर्ष तरूंगात खितपत पडून तुमचा तिथेच मृत्यू होईल. यातुन सुटलात तर तुम्हाला सुखाने जगू दिले जाणार नाही. यामुळे बंद झालेली आयपीएल पुन्हा सुरू झालीय. तिचा तुम्ही आनंद घ्या. बाप काय आज ना उद्या मरणार आहेच की !

# ऊस पिकातील तण नियंत्रण



तणांमुळे होणारे ऊस पिकाचे नुकसान हे कीड, रोग यांमुळे होणाऱ्या नुकसानीपेक्षा जास्त आहे परंतु मजुरांची कमतरता मजुरीचे वाढीव दर यामुळे तणांच्या बंदोबस्ताचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनलेला आहे उसामध्ये सर्वसाधारणपणे हराळी, लव्हाळा, शिंपी, चिमणचारा, कुंद्दा, केना ही अरुंद पानांची (एकदल) गतवर्गीय तणे, घेळ, माठ, गाजरगवत, चांदवेल, दुधानी, उंदीरकानी, गोखरू ही रुंद पानाची (द्विदल) गवतवर्गीय तणे आढळतात

या तणांच्या नियंत्रणासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

१) प्रतिबंधात्मक उपाययामध्ये पूर्वीचे पीक निघाल्यानंतर हराळी, लव्हाळा यासारख्या बहुवार्षिक व इतर तणांचा बंदोबस्त करण्यासाठी जमिनीची उभी आडवी खोल नांगरट, ढेकळे फोडणे, कुळवणी करणे, तणांचे अवशेष गोळा करून जाळून नष्ट करणे इत्यादी उपाययोजना केल्या जातात. मात्र, मशागत करताना पुढील गोष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

२) जमिनीची नांगरट, ढेकळे फोडणे, कुळवणी करणे इ. मशागतीची कामे वेळेवर पूर्ण करावीत.

३) तणे, धसकटे वेचून जाळून नष्ट करावी.

तणांमुळे होणारे ऊस पिकाचे नुकसान हे कीड, रोग यांमुळे होणाऱ्या नुकसानीपेक्षा जास्त आहे परंतु मजुरांची कमतरता मजुरीचे वाढीव दर यामुळे तणांच्या बंदोबस्ताचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनलेला आहे उसामध्ये सर्वसाधारणपणे हराळी, लव्हाळा, शिंपी, चिमणचारा, कुंदा, केना ही अरुंद पानांची (एकदल) गतवर्गीय तणे, घेळ, माठ, गाजरगवत, चांदवेल, दुधानी, उंदीरकानी, गोखरू ही रुंद पानाची (द्विदल) गवतवर्गीय तणे आढळतात

या तणांच्या नियंत्रणासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

१) प्रतिबंधात्मक उपाययामध्ये पूर्वीचे पीक निघाल्यानंतर हराळी, लव्हाळा यासारख्या बहुवार्षिक व इतर तणांचा बंदोबस्त करण्यासाठी जमिनीची उभी आडवी खोल नांगरट, ढेकळे फोडणे, कुळवणी करणे, तणांचे अवशेष गोळा करून जाळून नष्ट करणे इत्यादी उपाययोजना केल्या जातात. मात्र, मशागत करताना पुढील गोष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

२) जमिनीची नांगरट, ढेकळे फोडणे, कुळवणी करणे इ. मशागतीची कामे वेळेवर पूर्ण करावीत.

३) तणे, धसकटे वेचून जाळून नष्ट करावी.

ऊस पिकात आंतरपिकानुसार तणनाशकांचा वापरउसामध्ये आंतरपिकाचा समावेश केल्यामुळे तणांचा प्रादुर्भाव फारसा दिसत नाही परंतु आवश्यकतेनुसार खुरपणी करावी खाली दिल्याप्रमाणे निवडक रासायनिक तणनाशकांचा वापर करावा.

तणनाशके फवारताना घ्यावयाची काळजी

शिफारशीनुसार योग्य प्रमाणात वेळेवर तणनाशकांचा वापर करावा.

तण उगवणीपूर्वी तणनाशक फवारताना द्रावण सतत ढवळावे, संपूर्ण क्षेत्रावर तणनाशक एकसारखे फवारावे.

तणनाशके फवारताना मागे मागे सरकत यावे व फवारलेली जमीन तुडविली जाणार नाही याची काळजी घ्यावी.

तणनाशकाची सर्वत्र समान दाबाने फवारणी करावी.

तणनाशक फवारल्यानंतर ३ ते ४ दिवस जमिनीची कोणतीही मशागत करू नये, फवारणी केलेल्या क्षेत्रातील चारा जनावरांना वापरू नये.

**संकलन –**
**प्रवीण सरवदे, कराड**

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार १६ सप्टेंबर २०२३


## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते १७ सप्टेंबर रोजी मुख्य शासकीय ध्वजवंदन

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त रविवारी, १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथील हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन होणार आहे.

सकाळी ८.५० वाजता मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उभारण्यात आलेल्या स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करण्यात येईल व मानवंदना देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## रविवारी आयोजित 'रन फॉर स्कील' मॅरेथॉन स्पर्धेच्या मार्गात बदल

लातूर : राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभागाचे मंगल प्रभात लोढा यांच्या आदेशानुसार लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने १७ सप्टेंबर २०२३ रोजी 'रन फॉर स्कील' मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉनच्या मार्गात बदल झाला असून ही मॅरेथॉन आता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजीव गांधी चौक या मार्गावर होईल, अशी माहिती लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथून सकाळी ७ वाजता मॅरेथॉनला सुरुवात होईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्था ते राजीव गांधी चौक आणि पुन्हा राजीव गांधी चौक ते औद्योगिक प्रशिक्षण संस्था दरम्यान ही मॅरेथॉन होईल. यामध्ये सुमारे ४०० प्रशिक्षणार्थी सहभागी होतील. तसेच सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक रुपये ३ हजार, द्वितीय क्रमांक २ हजार व तृतीय क्रमांक १ हजार असे अनुक्रमे पुरुष व महिला स्वतंत्रपणे देण्यात येतील, असे लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविल आहे.

# प्रसाद बनविताना नियमांचे पालन करा

लातूर : गणेशोत्सव, दसरा आदी सणासुदीच्या काळात विविध मंडळातर्फे भंडारा, प्रसाद, अन्नदान इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. यासाठी अन्नपदार्थ, प्रसाद तयार करताना गणेश मंडळे, अन्न व्यावसायिक, उत्पादक यांनी अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ आणि त्यांअतर्गत नियम व नियमन २०११ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असल्याचे अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त शि. बा. कोडगिरे यांनी केले आहे.

प्रसाद वितरण करणाऱ्या मंडळांनी अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत www.foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करून प्रतिवर्षी शंभर रुपये भरून नोंदणी प्रमाणपत्र घ्यावे. प्रसाद तयार करताना उत्पादनाची जागा स्वच्छ व आरोग्यदायी असावी, प्रसादासाठी लागणारे अन्नपदार्थ परवानाधारक अथवा नोंदणीकृत अन्न व्यवसायिकाकडूनच खरेदी करावे. परवाना, नोंदणी असलेल्या केटरर्सकडून प्रसाद बनवून घ्यावा. प्रसादासाठी लागणारी भांडी स्वच्छ, आरोग्यदायी व झाकण असलेली असावी. आवश्यक तेवढ्याच प्रसादाचे उत्पादन करावे, उरलेल्या अन्नपदार्थाची योग्य रीतीने विल्हेवाट लावावी. प्रसाद उत्पादन व वितरण करणारा स्वयंसेवक हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असावा, भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.

सर्व स्वीट मार्ट उत्पादक, विक्रेते यांनी सणासुदीच्या काळात स्वच्छ, ताजी मिठाई, मोदक तयार करून विक्री करावी. कच्चामाल हा परवानाधारक अथवा नोंदणीकृत अन्न व्यवसायिकाकडूनच खरेदी करावा. त्याची पक्की बिले घेवून पेढीमध्ये जतन करून ठेवावे. मिठाईच्या ट्रेसमोर बेस्ट बिफोरचा बोर्ड लावाला.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशान्वये अपर जिल्हाधिकारी सुनील यादव यांच्या अध्यक्षतेखाली दुध भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सणासुदीच्या काळात नागरिकांना भेसळमुक्त, शुद्ध, ताजे व उत्तम प्रतीचे दुध व दुग्धजन्य पदार्थ मिळावेत, यासाठी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांच्या समवेत १८ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत जिल्ह्यातील २१ दुध डेअरी, खवा व पेढा भट्टी व दुकाने, दुध संकलन केंद्रांच्या तपासण्या करून दुध, खवा आणि पेढ्याचे ३२ नमुने विश्र्लेषणासाठी घेण्यात आलेले आहेत. दुध व दुग्धजन्य पदार्थ व्यावसायिकांनी अन्न परवाना घेतल्या शिवाय व्यवसाय करू नये अन्यथा संबंधितांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

लातूर जिल्ह्यातील नागरिकांना दुध व दुग्धजन्य पदार्थाबाबत काही तक्रार अथवा जिल्ह्यात कोठेही दुध व दुग्धजन्य पदार्थामध्ये भेसळ होत असल्यास अन्न व औषध प्रशासन कार्यालयास किंवा १८००२२२३६५ या टोल फ्री तक्रार नोंदवून सहकार्य करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त शि. बा. कोडगिरे यांनी केले आहे.



## मराठवाडा मुक्तिलढ्यातील दुर्मिळ छायाचित्राचे शहरकर गुरूजी यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनामार्फत ग्रंथ व दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनामुळे लातूरकरांना मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास सचित्र स्वरुपात समजून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. १५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२३ दरम्यान सकाळी अकरा ते सायंकाळी सहापर्यंत हे प्रदर्शन सुरु राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुक्तिसंग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक जीवनधर शहरकर यांच्या हस्ते आज झाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, माजी सनदी अधिकारी तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, तहसीलदार गणेश सरोदे, इतिहास अभ्यासक डॉ. सुनील पुरी, भाऊसाहेब उमाटे यांची यावेळी प्रमुख उपस्थित होते.

ग्रंथ व दुर्मिळ छायाचित्रे प्रदर्शनात २२५ पेक्षा अधिक मौल्यवान आणि दुर्मिळ ग्रंथ, मुक्तिसंग्रामातील विविध घटना, प्रसंगांची दुर्मिळ छायाचित्रे, तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये मुक्तिसंग्रामाविषयी प्रसिद्ध झालेल्या बातम्या, अग्रलेख, भाषण, शासकीय पत्रव्यवहार व आदेश, मुक्तिसंग्रामावर आधारित शोध प्रबंध आदी महात्पूर्ण दस्तावेज पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या प्रदर्शनातील ग्रंथ व दुर्मिळ वृत्तपत्र याचे संकलन इतिहास अभ्यासक प्रा. डॉ. सुनील पुरी आणि भाऊसाहेब उमाटे यांनी महत्वपूर्ण भूमिका बजाविली आहे. नागरिकांनी या प्रदर्शनास भेट देवून मराठवाडा मुक्तिसंग्राचा इतिहास जाणून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पात्र दिव्यांग बांधवांनी मतदार नोंदणी करावी-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील मतदारांची नोंदणी सुरु असून पात्र दिव्यांग बांधवांनीही या मोहिमेंतर्गत आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित दिव्यांग बांधवांच्या कार्यशाळेत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुचिता शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी, राज्य दिव्यांग निवडणूक दूत बस्वराज पैके आदी उपस्थित होते. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मतदार नोंदणी शिबिरात ६५ पात्र दिव्यांग बांधवांची नव्याने मतदार नोंदणी करण्यात आली.

मतदान हा आपला हक्क असून मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी मतदार यादीमध्ये नाव असणे अनिवार्य आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र व्यक्तीने आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून पात्र नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

## भाजप महिला मोर्चाच्या वतीने मेरी माटी मेरा देश अभियान संपन्न

लातूर : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सबंध देशभरात सुरू असलेले मेरी माटी मेरा देश हे अभियान काल गुरुवारी लातूर शहरात महिला मोर्चाच्या वतीने राबवण्यात आले.महिला मोर्चाच्या प्रदेशच्या नेत्या सौ.संध्याताई राजपूत, सौ.सुवर्णाताई बैकरे,सौ.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान शहरातील पूर्व भागात,औसा रोडवर आणि हडको परिसरात यशस्वीपणे राबवण्यात आले. यावेळी घराघरात जाऊन कलशमध्ये माती गोळा करण्यात आली.ही जमा केलेली माहिती आयोध्येच्या पावन भूमीत जाणार आहे. या अभियानाला जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या अभियानात महिला मोर्चाच्या नूतन शहर जिल्हाध्यक्ष सौ.रागिणी यादव,शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष देविदास काळे,मंडळ अध्यक्ष प्रमोद गुडे, महिला मोर्चा उपाध्यक्ष अँड शीतल पाटील, माजी नगरसेविका स्वाती घोरपडे, महिला मोर्चा मंडळ अध्यक्ष सो निर्मलाताई कांबळे,सौ.रत्नमाला घोडके,सौ.संगीता शिंदे,सौ.आफरीन शेख ,सौ.हेमा येळे, सुमन राठोड, बाबासाहेब बनसोडे, श्री कांबळे सर, सौ कल्पनाताई कुलकर्णी,सौ. वेदपाठक,श्री.प्रवीणजी घोरपडे, मंडळ अध्यक्ष अमोल गीते,सौ.जयश्रीताई भुतेकर,सौ.काशीबाई हांडे,सौ.देवकन्या राऊत,सौ.आशाताई रूपचंदानी , सौ.रोहिणी देशमुख,सौ. ढगे आदींनी सक्रिय सहभाग नोंदवत हे अभियान यशस्वी केले.

### CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **ABDUL BASID GAUSKHAN PATHAN TO : ABDULBASIT GAUSKHAN PATHAN** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ABDULBASIT GAUSKHAN PATHAN** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : ABDUL BASID GAUSKHAN PATHAN**
**NEW NAME : ABDULBASIT GAUSKHAN PATHAN**
**ADDRESS : NEAR YASIN MASJID ANSAR NAGAR MHAISUR COLONY LATUR**

### CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **PARVIN BI SALIM PATWEKAR TO : PARVINBI SALIM PATWEKAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **PARVINBI SALIM PATWEKAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE
**OLD NAME : PARVIN BI SALIM PATWEKAR**
**NEW NAME : PARVINBI SALIM PATWEKAR**
**ADDRESS : BOUDDH NAGAR, LATUR**

### CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **SAYYED AFREEN IRSHAD TO : AFRIN IRSHAD SAYYED** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **AFRIN IRSHAD SAYYED** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : SAYYED AFREEN IRSHAD**
**NEW NAME : AFRIN IRSHAD SAYYED**
**ADDRESS : BEHIND MILIND SCHOOL LABOUR COLONY LATUR**

### CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **SHAIKH RABBANA JAINUDDIN TO : ANITA ANIL AMBEKAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ANITA ANIL AMBEKAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : SHAIKH RABBANA JAINUDDIN**
**NEW NAME : ANITA ANIL AMBEKAR**
ADDRESS :- AT KAILASH NAGAR, LATUR, LATUR, MAHARASHTRA-413512

जा. जा.क्र.लामनपा/बांध./५९२२/२०२३-२४
लातूर शहर महानगपालिका, लातूर.
दिनांक :- १४/०९/२०२३

**विभागाचे नांव :- सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

**ई-निविदा क्र. ३३/२०२३-२०२४**

आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर हे म. न. पा. निधी अंतर्गत म. न. पा. मुख्य ईमारतीमध्ये लिफ्ट बसविणे रू. १९.९७ लक्षच्या कामाकरिता शासनाचे नोंदणीकृत पुरवठाकार/कंत्राटदाराकडून मोहोरबंद ई-निविदा प्रणालीद्वारे निवीदा मागवित आहे.

निविदा कागदपत्रांचा तपशील व इतर माहिती शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याची निवीदाधारकांनी खात्री करून घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**अति आयुक्त,**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

## लातूर महानगरपालिका कर्मचारी सह. पतसंस्था मर्या., लातूर

र. न. ओएसएम/बीएनके/१०५ दिनांक २९.०४.१९६५

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

दि. १५/०९/२०२३

पतसंस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची साल सन २०२२-२०२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३०.०९.२०२३ वार शनिवार रोजी सकाळी १०.०० वा. पतसंस्थेचे कार्यालय, ठाकरे चौक, मनपा शाळा क्र. ०४ येथे पतसंस्थेचे अध्यक्ष श्री धोंडीबा सिताराम सोनवणे यांचे अध्यक्षतेखाली बोलावण्यात आली आहे. त्यात खालील विषयांवर चर्चा व विचारविनीमय करून ठराव मंजूर करण्यात येणार आहेत.

तरी सर्व सन्मानीय सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**: सभेपुढील विषय :**

१) पतसंस्थेच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
२) पतसंस्थेच्या साल २०२२-२०२३ च्या वार्षिक आर्थिक पत्रकाचे वाचन करून संमत करणे.
३) साल सन २०२२-२०२३ च्या ऑडीट रिपोर्टचे वाचन करणे व दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे.
४) पतसंस्थेच्या साल सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५) पतसंस्थेच्या साल सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) संस्थेच्या सभासदांना वैयक्तीक रू. ३००००० ऐवजी रू. ५००००० ची कर्जाची मर्यादा वाढवणे बाबत विचार विनिमय करणे.
७) साल सन २०२३-२०२४ च्या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकाचे नेमणूक करणे.
८) आयत्या वेळेचे विषय मा. अध्यक्षांच्या परवानगीने मांडता येतील.

(संचालक मंडळाच्या आदेशावरून)

**टिप :**
१) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा गणपुर्ती अभावी तहकुब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

**सेक्रेटरी    चेअरमन**
**लातूर महानगरपालिका कर्मचारी सह. पतसंस्था म. लातूर**

### Change Of Name

I have Change my Name **Kalantry Sapna Sunilkumar** To **Kalantri Sapna Sunilkumar** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Kalantri Sapna Sunilkumar** in future the same name will be used by me.
**Old Name : Kalantry Sapna Sunilkumar**
**New Name : Kalantri Sapna Sunilkumar**
**Address :** Ambika Pulses, Market Yard, Latur.

### Change Of Name

I have Change my Name **Kalantry Sunilkumar Pannalalji** To **Kalantri Sunilkumar Pannalal** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Kalantri Sunilkumar Pannalal** in future the same name will be used by me.
**Old Name : Kalantry Sunilkumar Pannalalji**
**New Name : Kalantri Sunilkumar Pannalal**
**Address :** Kapad Galli, Latur.

### Change Of Name

I have Change my Name **Shaikh Hasinabee Rabbani** To **Shaikh Hasinabanu Rabbani** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Shaikh Hasinabanu Rabbani** in future the same name will be used by me.
**Old Name : Shaikh Hasinabee Rabbani**
**New Name : Shaikh Hasinabanu Rabbani**
**Address :** Islampura, Galli No. 4, Latur.

### Change Of Name

I have Change my Name **Maname Murali Sitaram** To **Manme murli Sitaram** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Manme murli Sitaram** in future the same name will be used by me.
**Old Name : Maname Murali Sitaram**
**New Name : Manme murli Sitaram**
**Address :** Dhanraj Park, Ambajogai Road, Latur.

### Change Of Name

I have Change my Name **Sarvade Nita Laxman** To **Ranher Neeta Sandeep** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Ranher Neeta Sandeep** in future the same name will be used by me.
**Old Name : Sarvade Nita Laxman**
**New Name : Ranher Neeta Sandeep**
**Address :** Darga Road, Muncipal Colony, Parbhani

### Change Of Name

I have Change my Name **Kamdar Janhvi Avinash** To **Kamdar Janhavi Avinash** Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Kamdar Janhavi Avinash** in future the same name will be used by me.
**Old Name : Kamdar Janhvi Avinash**
**New Name : Kamdar Janhavi Avinash**
**Address :** Signal camp, Latur

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते